के.सी.ई.सोसायटीचे

# एस.एस.मणियार विधी महाविद्यालय, जळगांव जिल्हा-जळगांव

(राष्ट्रीय मुल्यांकन दर्जा - बी + +)

## व्याख्याता पाहिजेंत

शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये कायम विनाअनुदान तत्वावरील एलएल.एम भाग-१ व २ या पदव्युत्तर वर्गासाठी खालील प्रमाणे पदे भरण्याकरीता विहित शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विषय | पदसंख्या | पदाचा संवर्ग |
|---|---|---|---|
| ०१ | विधी (एलएल.एम) | ०४ | ०१ अनुसुचित जाती , ०१ अनुसूचित जमाती , ०२ खुले |

**व्याख्याता पदासाठी शैक्षणिक अर्हता :**

१. व्याख्याता पदांसाठी संबंधित विषयातील पदवी परीक्षेत ५० % गुण (मागासवर्गीयसाठी व अपंगांसाठी ४५ % गुण ) आणि संबंधित विषयातील पदव्युत्तर परीक्षेत ५५ % गुण (एस.सी., एस.टी. व अपंगांसाठी ५० % गुण ) असणे आवश्यक आहेत.

२. व्याख्याता या पदाकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार संबंधित विषयातील नेट / सेट परीक्षा उत्तीर्ण तथापी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.१४ जून २००६ च्या अधिसूचनेत (दुसरी दुरुस्ती) नमूद केल्याप्रमाणे, तसेच महाराष्ट्र शासनाचे क्र.एनजीसी./२००८/(३०३/०८)/विशी-४, दि.१७ मार्च २००९ चे पत्र व त्यासोबत पाठविलेल्या मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि.२७ नोव्हेंबर २००८ रोजी दिलेला निकाल लक्षात घेवून कार्यवाही करण्यात येईल.

३. उमेदवाराने दि. ३१.१२.२००२ पूर्वी पीएच.डी. चा प्रबंध विद्यापीठास सादर करुन पीएच.डी. पदवी प्राप्त केली असेल अशा उमेदवारांनाही अर्ज करता येईल.

४. पीएच.डी. पदवी धारण केलेल्या उमेदवारांनी दि. १९.०९.१९९१ पूर्वी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केलेली असल्यास अशा उमेदवारांना पदव्युत्तर वर्गासाठी ५ % गुणांची सवलत दिली जाईल.

**इतर अटी :**

१. शासन निर्णयानुसार ३ % जागा अपंगामधुन व ३० % जागा महिला प्रवर्गातून भरण्यात येतील.

२. अनुसूचित जमाती संवर्गातील उमेदवारांना मुलाखतीच्या वेळी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना (अनुसूचित जमाती वगळून ) शासन आदेश दि. २८ जानेवारी २००४ नुसार तीन महिन्याच्या आत जातीचे वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयास सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन आदेशानुसार ज्या मागासवर्गीय उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र आवश्यक असते, त्या उमेदवारांनी चालू आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. वरील सर्व पदांकरीता शैक्षणिक पात्रता, सेवाशर्ती वेतनश्रेणी इ. महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या नियमानुसार राहतील.

४. वरील पदांसाठी पात्र उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रांच्या सत्य प्रतीसह जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अध्यक्ष / सचिव /प्राचार्य यांच्या नावे अर्ज पाठवावेत. त्याप्रमाणे अर्जाची एक प्रत उपकुलसचिव, व्याख्याता मान्यता विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचेकडे जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत सादर करणे आवश्यक राहील. तसेच जे उमेदवार सेवेत इतरत्र कार्यरत असतील अशा उमेदवारांनी अर्ज योग्य मार्ग (Though proper Channel) पाठविणे आवश्यक आहे.

प्राचार्य
एस.एस.मणियार विधी महाविद्यालय,
जळगांव.

अध्यक्ष
खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी,
जळगांव.